| | | | | |
|---|---|---|---|---|
| दावा दाखल तारीख | : | ०७/०१/२०१६ | | |
| दावा नोंदणी तारीख | : | ०७/०१/२०१६ | | |
| दावा निकाल तारीख | : | ०६/०५/२०२६ | | |
| कालावधी | | **व.** | **म.** | **दि.** |
| | | १० | ०३ | ३० |

**दिवाणी न्यायाधीश क. स्तर न्यायालय, मालवण**
( पीठासीन अधिकारी श्री. एम.के.फकीह)

**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ०४/२०१६</u>**
**<u>निशाणी क्र. ५४</u>**

| | |
|---|---|
| श्रीमती प्रमिला शिवाजी तारी,<br>वय ६७ वर्षे, व्यवसाय – जेष्ठ नागरिक,<br>रा. वायरी ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग,<br>तर्फे कुलमुखत्यारी<br>श्रीमती अनिता प्रकाश भोसले,<br>वय ३४ वर्षे, व्यवसाय – नोकरी,<br>सध्या रा. एकवीरा अपार्टमेंट रुम नं. १,<br>रामदास वाडी, सिंधी गेट, कल्याण (प)<br>४२१ ३०१. | वादी |

विरुध्द

| | |
|---|---|
| १) श्रीमती सुमन वासुदेव परब,<br>वय ६० वर्षे, धंदा – निवृत्त शासकीय अधिकारी,<br>रा. आशिर्वाद बंगला, न्याहरी निवाराच्यासमोर,<br>तारकर्ली रोड, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ,<br>कामगार कल्याण केंद्र मालवणच्या बाजूला,<br>वायरी, जिल्हा सिंधदुर्ग. | प्रतिवादी |

---

वादी तर्फे विधिज्ञ – श्री.आर.जी.पाटील
प्रतिवादी तर्फे विधिज्ञ – श्री.यु.बी.कुळकर्णी

---

सत्यमेव जयते

**न्या य नि र्ण य**

(अधिघोषित दि. ०६ मे, २०२६)

वादीने प्रस्तुतचा दावा हक्क ठराव होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. **वादीचे कथन थोडक्यात असे आहे की** –

**मिळकतीचे वर्णन**

गाव मौजे वायरी, ता. मालवण जि. सिंधुदूर्ग येथील सर्व्हे नं. ६४८अ हि.नं. ५ब क्षेत्र हे.०–०२–४ आर पोख खराब ०–००–१ आर आकार रु.०–१३ पैसे ही दावा विषयक मिळकत आहे. सदर मिळकतीस यापुढे ‘ दावा मिळकत ’ म्हणून संबोधण्यात येते. सदरची मिळकत वादीचे पती कै. शिवाजी नारायण तारी यांचे मालकी वहिवाटीची मिळकत असून ती महसूल दप्तरी नोंद होती. सदर मिळकतीशी प्रतिवादी यांचा अगर इतरांचा कोणताही हक्कसंबंध नव्हता व नाही.

३. वादीचे पती हे एका नामांकित कंपनीमध्ये नोकरीस होते त्यामुळे त्यांची आर्थीक परिस्थिती अतिशय उत्तम असल्याने त्यांना त्यांची जमिन विक्री करण्याची गरज नव्हती. असे असताना दावा मिळकत ही प्रतिवादींनी फसवणुकीने, खोटारडेपणाने दुय्यम निरिक्षक मालवण यांची दिशाभूल, फसवणूक करुन दि. २३/०५/१९८९ रोजी दस्त अ.क्र. १५०–१/७/१९८९ चे खरेदीखत कोणीतरी बनावट इसमास उभे करुन करुन घेतलेले आहे. सदर खरेदीखताचा अंमल दि. ११/८०९/१९८९ फेरफार क्र. ११३१५ ने देण्यात आलेला आहे. प्रतिवादी हया मौजे वायरी येथे राहत नव्हत्या त्या जे.जे.हॉस्पीटल मध्ये परिचारिका म्हणून कल्याण

येथे निवासस्थानी राहत होत्या. त्यांनी कधीही शेती केलेली नव्हती. सदर कथीत खरेदीखताच्या पुर्वी प्रतिवादी यांच्या नावावर कोणतीही शेत जमिन नव्हती अगर त्या शेतकरीही नव्हत्या. त्यामुळे त्यांना असे कथीत बोगस खरेदीखतान्वये जमिन खरेदी करण्याचा कायदेशीर हक्कच प्राप्त होत नाही. त्यामुळे सदरचे खरेदीखत हे तसेच खरेदीखतामध्ये लिहिलेला मोबदला रक्कम प्रतिवादी यांनी कधीही दिलेला नसल्याने सदरचे खरेदीखत हे आपोआपच बेकायदेशीर आहे. त्यामुळे सदरचे खरेदीखत हे बोगस, बनावट असल्याने ठरवून सदरचे खरेदीखत वादींवर बंधनकारक नाही असे ठरवून मिळणेसाठी वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

४. प्रतिवादी यांनी नि.क्र. १० येथे आपली कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध दर्शविला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार वादीचा दावा हा खोटा व खोडसाळ आहे. दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे असून दावा मिळकतीचा आकार चुकीचा दर्शविला आहे. सदरची दावा मिळकत वादीचे पती शिवाजी नारायण तारी यांनी कौंटूंबिक गरजेसाठी व कुटूंबाच्या कल्याणासाठी मोबदला स्वीकारुन दि. २३/०५/१९८९ रोजीच्या रजिष्टर खरेदीखत क्र. १५०/१९८९ ने प्रतिवादींना खरेदी दिलेली आहे. याची कल्पना वादी, वादीचे मुखत्यार व त्यांची मुले यांना होती. सदर खरेदीखतावेळीच वादीचे पतीने दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादी यांना दिलेला असून तेव्हापासून सदर मिळकतीचा कब्जा प्रतिवादी यांचेकडे आहे. त्यामुळे सन २०१५ साली सदरच्या नोंदणीकृत खरेदीखताबद्दल दाखल केलेला दावा हा मुळातच चुकीचा व मुदतबाहय असून दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते. सदर खरेदीखताबाबत फेरफार नं. ११३१५ हा सन

१९८९ सालीच कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन मंजूर करण्यात आलेला आहे. सदरच्या फेरफार हा वादींनी सन २०१५ पर्यत कोणतीही कायदेशीर हरकत उपस्थित करुन सदरचा फेरफार रद्द करुन घेतलेला नाही. सदर खरेदीखतापासून तीन वर्षाचे आत वादी अगर वादीच्या मुलापैकी कोणीही सदरचे खरेदीखत फसवणुकीने, लबाडीने, दिशाभू करुन अगर गैरमार्गाने केल्याची तक्रार करुन खरेदीखत दिवाणी न्यायालयातून रद्दबातल ठरवून घेतलेले नाही. त्यामुळे सदरच्या खरेदीखताबाबत केलेली सर्व विधाने ही प्रामाणिकपणाचे नसून ती लबाडीचे आहेत. त्यामुळे वादीचा दावा खर्चासह फेटाळण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे. तसेच वादीने प्रस्तुतचा खोडसाळ व खोटा, मुदतबाहय दावा दाखल करुन प्रतिवादी हिला नाहक खर्चात टाकल्याने प्रतिवादी हिला झालेला खर्च वादीकडून मिळावा अशी विनंती केली आहे.

५. वादी व वादीचे वकील यांना पुरेशी संधी मिळून देखील त्यांनी युक्तीवाद केला नाही. त्यामुळे दि.१५/०४/२०२६ रोजी वादीचा युक्तीवाद नाही असा नि.क्र. १ वर आदेश पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. यु.बी.कुळकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला.

६. वादपत्रातील उपस्थित करण्यात आलेले कथन तसेच प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कैफियतीच्या अनुषंगाने माझे पुर्वाधिकारी यांनी नि.क्र.१२ येथे खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले असून मी त्याचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी हे सिध्द केले आहे काय की, दि. २३/०५/१९८९ रोजीचे खरेदीखत क्र. मलव १५०–१/७/१९८९ हे बनावट व बोगस आहे ? | : | नकारार्थी |
| २. | वादी हे सिध्द केले आहे काय की, प्रतिवादीने दि. २३/०५/१९८९ रोजीचे खरेदीखत क्र. मलव १५०–१/७/१९८९ हे वादीवर बंधनकारक नाही ? | : | नकारार्थी |
| ३. | प्रतिवादीने हे सिध्द केले आहे काय की, दाव्याची आकारणी चुकीची आहे ? | : | नकारार्थी |
| ४. | दाव्यास मुदतीच्या अधिनियमाच्या तरतुदींचा बाधा येते काय ? | : | होकारार्थी |
| ५. | वादी ही प्रतिवादीविरुध्द तिने मागितलेली हक्कप्रस्थापनेची दाद मंजूर होवून मिळणेस पात्र होते काय ? | : | नकारार्थी |
| ६. | प्रतिवदी ही वादीकडून दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम ३५अ अन्वये नुकसानभरपाई पोटी खर्च मिळण्यास पात्र होते काय ? असल्यास खर्चाची रक्कम किती | : | नकारार्थी |
| ७. | अंतिम आदेश व हुकूमनामा काय ? | : | दावा खर्चासह नामंजूर करण्यात येतो. |

## का र ण मी मां सा

७. वादीने त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ कुलमुखत्यार अनिता प्रकाश भोसले यांनी नि.क्र.४० वरती पुराव्याचे शपथपत्र दाखल केले होते. परंतु ती उलट तपासाकरीता हजर राहिली नाही. म्हणून नि.क्र. ४० वर

दाखल असलेले तिचे पुराव्याचे शपथपत्र दि. १७/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये रद्दबातल करण्यात आलेले आहे. तसेच वादीने पुढील पुरावा न दिल्याने वादीचा पुरावा दि. २२/१२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये बंद करण्यात आलेला आहे. वादीने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिवादी यांनी देखील त्यांचा कोणताही पुरावा दिलेला नाही. प्रतिवादी यांनी नि.क्र. ५३ च्या पुरशीस अन्वये त्यांचा पुरावा बंद केला आहे.

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ करिता</u> –**

८. वादीच्या कथनानुसार दावा मिळकतचे वादीचे पतीने केलेले दि. २३/०५/१९८९ रोजीचे खरेदीखत क्र. मलव १५०–१/७/१९८९ हे बनावट व बोगस असून ते वादीवर बंधनकारक नाही असा ठराव होवून मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. वादीने सदरचे खरेदीखत बनावट असल्याचे शाबीत करण्यासाठी वादी हिने तोंडी अगर इतर कोणताही पुरावा दिलेला नाही. वादीने नि.क्र. ४३ येथे अर्ज दाखल करुन मुळ खरेदीखत व वादीचे पती कै. शिवाजी तारी यांचे जनता सहकारी बँकेकडे असलेल्या मुळ सहया पडताळणीसाठी हस्ताक्षर तज्ञ यांचेकडे पाठविण्याची विनंती केली होती. सदरचा अर्ज दि. २७/११/२०२४ रोजी मंजूर करण्यात आला, परंतु वादी यांना पुरेशी संधी मिळून देखील हस्ताक्षर तज्ञांची फि रक्कम रु. ५०००/– न्यायालयात जमा केली नाही. त्यामुळे सदर आदेशाचे वादीस स्मरण व्हावे याकरीता दि. २०/०९/२०२५ रोजी आदेश पारीत करण्यात आला आहे.

९. वादीने तिचे कथनांच्या पुष्ठयर्थ कोणताही पुरावा दिलेला नाही. वादीने दिलेला पुरावा दि. १७/११/२०२५ रोजीच्या आदेशाने

रद्दबातल करण्यात आलेला आहे. त्यानंतर वादीने रद्द करण्यात आलेला पुरावा पुर्नजिवीत करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे वादीचे पतीने प्रतिवादी यांना दि. २३/०५/१९८९ रोजीचे खरेदीखत क्र. मलव १५०-१/७/१९८९ हे बनावट व बोगस असून ते वादीवर बंधनकारक नाही हे शाबीत झालेले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता</u>**

१०. प्रतिवादी यांनी कैफियतीमध्ये वादीने केलेली दाव्याची आकारणी ही चुकीची असल्याचा आक्षेप नोंदविलेला आहे. वादी यांनी त्यांच्या विनंती कलमांमध्ये २३/०५/१९८९ रोजीचे खरेदीखत क्र. मलव १५०-१/७/१९८९ हे बनावट व बोगस असल्याचा ठराव होवून मिळणेकरीता व सदरचे खरेदीखत वादींवर बंधनकारक नाही असा ठराव होवून मिळणेकरीता दाखल केलेला केला असून त्याकरीता या दोन्ही ठरावाकरीता दाव्याची आकारणी प्रत्येकी १,०००/- करुन त्यावर मुंबई कोर्ट फी ॲक्ट कलम ६(iv)(जे) प्रमाणे कोर्ट फि दिलेली आहे. त्यामुळे वादीने केलेली दाव्याची आकारणी बरोबर आहे. करीता मी मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>**

११. वादीच्या प्रस्तुत दाव्यास मुदतीच्या कायदयाची बाधा आहे अशी हरकत प्रतिवादी यांनी घेतलेली आहे. वादी यांनी दि. २३/०५/१९८९ रोजीचे खरेदीखत क्र. मलव १५०-१/७/१९८९ हे

बनावट व बोगस असून ते वादीवर बंधनकारक नाही असे हक्कप्रस्थापना होवून मिळणेसाठी दावा दाखल केलेला आहे. वादी यांनी दाव्यामध्ये त्यांना सदर खरेदीखताची माहिती दि. २६/०५/२०१५ रोजी दावा मिळकतीचे ७/१२ उतारे व फेरफार काढले असता त्यांना माहिती झाल्याचे कथन केले आहे. परंतु वादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठयर्थ असा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे वादीला सदर खरेदीखताची माहिती दि. २६/०५/२०१५ रोजी झाले हे शाबीत होत नाही. त्यामुळे वादीच्या दाव्यास मुदतीच्या कायदयाची बाधा येते. करीता मी मुद्दा क्र. ४ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता</u>**

१२. वादी ही दावा मिळकतीचे तिचे पतीने केलेले दि. २३/०५/१९८९ रोजीचे खरेदीखत क्र. मलव १५०–१/७/१९८९ हे बनावट व बोगस असून ते वादीवर बंधनकारक नाही हे शाबीत केलेले नाही. त्यामुळे वादी ही तिने मागितलेल्या हक्कप्रस्थापनेच्या दादी मंजूर होवून मिळणेस पात्र नाही. करीता मी मुद्दा क्र. ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ६ करीता</u>**

१३. वादीने प्रतिवादीविरुध्द खोटा व खोडसाळ दाखल केल्याने प्रतिवादी यांना झालेला खर्च वादीकडून मिळावा अशी विनंती केली आहे. परंतु वादीने दाखल केलेला दावा हा खोटा व प्रतिवादीस मनस्ताप देणार

आहे असे प्रतिवादी यांनी पुरावा देवून शाबीत केलेले नाही. जरी दावा नामंजूर झाला याचा अर्थ असा होत नाही की, सदरचा दावा हा खोटा व खोडसाळ दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींनी केलेली नुकसान भरपाईची मागणी मंजूर होणेस पात्र नाही. सबब, मी मुद्दा क्र. ६ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ७ करीता**

१४. वरील सर्व विवेंचनावरुन असे स्पष्ट होते की, वादीनी त्याचा दावा शाबीत केलेला नाही. सबब, मुद्दा क्र. १ ते ६ चे निष्कर्षाचे अनुषंगाने मुद्दा क्र. ७ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

| आदेश | |
|---|---|
| १. | दावा खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे. |
| २. | येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला. |

सही/-
मालवण. एम.के.फकीह,
दि. ०६/०५/२०२६. दिवाणी न्यायालय, क.स्तर मालवण.